# 'पूल कॅम्पस ड्राइव्ह' मुळे विद्यार्थ्यांना नोकरीची संधी



■ **ऋतुजा लोहार (मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी फॉर लेडीज, मोशी)**

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मोशी येथील मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी फॉर लेडीज येथे टेककेअर मेडिकल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड (टीसीएमएस) या कंपनीच्या 'मेडिकल रेकॉर्ड एक्झिक्युटिव्ह' पदासाठी 'पूल कॅम्पस ड्राइव्ह' आयोजित केले. या कॅम्पस ड्राइव्हसाठी राज्यातील विविध कॉलेजमधील अंतिम वर्षाचे विद्यार्थी आणि उत्तीर्ण झालेल्या विविध कोर्सेसचे (डी.फार्म, बी.फार्म, एम.फार्म, फार्म.डी आणि बी. एससी) एकूण ७७५ नोंदणी प्राप्त झाल्या होत्या. ड्राइव्हचे उद्घाटन आणि मुलाखत पॅनल सदस्यांचे सत्कार प्राचार्य डॉ. एस. एन. ढोले यांच्या हस्ते झाले. टीसीएमएसच्या सहाय्यक व्यवस्थापक (एचआर) आरती व्यास यांनी कंपनीचे अवलोकन, नोकरी प्रोफाइल आणि मुलाखत प्रक्रिया याबद्दल मार्गदर्शन केले. २५७ विद्यार्थी पहिल्या फेरीच्या मुलाखतीसाठी (अभिक्षमता चाचणी) उपस्थित होते. दुसऱ्या फेरीसाठी ५४ उमेदवारांची निवड झाली, त्यांची मुलाखत टीसीएमएस पॅनलने घेतली. त्यात ४४ विद्यार्थ्यांची मुंबई येथील टीसीएमएस कार्यालयात होणाऱ्या तांत्रिक फेरीसाठी निवड झाली. टीसीएमएसकडून व्यास, सुश्री उमा संकद आणि सिद्धार्थ सांगरे यांचा मुलाखत पॅनलमध्ये समावेश होता. संपूर्ण कॅम्पस ड्राइव्हचे समन्वयक महाविद्यालयाचे प्रशिक्षण आणि प्लेसमेंट अधिकारी डॉ. राहुल शिवरकर, धनश्री कड, लिनेटा राऊत, डॉ. अक्षय मचाले आणि पूल कॅम्पस ड्राइव्ह समिती सदस्य होते.